**शैक्षणिक वर्ष सन २००९-२०१० पासून शैक्षणिक व अन्य शुल्क निश्चित करण्याकरिता अभ्यास करुन शिफारशी करण्यासाठी समितीची स्थापना करणेबाबत**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२००९/(१०८/०९)/माशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ जून, २००९

**वाचा :** शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००९/(१०८/०९)/माशि-३, दि.८ मे,२००९.

**शासन निर्णय :-**

टी.एम.ए.पै. फाऊंडशन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने दि.२७ मे,२००३ अन्वये खाजगी विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील प्रवेश, आरक्षण, शुल्क व सवलती इत्यादी संदर्भातील आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, मुंबई उच्च न्यायालयात स्टयूडटंस वेल्फेअर असोशिएशन यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.४५०३/२००९ च्या अनुषंगाने सन्माननीय न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, फी व इतर शुल्क निश्चित करण्यासंदर्भात एक समिती स्थापन करण्यात यावी व दरम्यानच्या काळात फी वाढ करण्यात येवू नये, याबाबतीत योग्य त्या सूचना संबंधितांना द्याव्यात.

त्या अनुषंगाने शासन निर्णय दि.८ मे २००९ अन्वये, शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क निश्चित करण्याकरीता स्वतंत्र शुल्क नियंत्रण समितीची स्थापना करण्यात येईपर्यंत कोणत्याही प्रकारची फी वाढ करण्यात येवू नये, असे आदेश काढण्यात आले आहेत.

दरम्यानच्या काळात शिक्षण शुल्क व इतर शुल्क ठरविण्यासाठी शाळांनी कोणकोणत्या बाबी विचारात घेण्यात याव्यात याचा अभ्यास करुन, तसेच टी.एम.ए.पै.फाउंडेशन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या व मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने शाळांनी फी वाढ कशा प्रमाणे करण्यात यावी याची शासनास शिफारस करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत आता निर्णय झाला असून खालीलप्रमाणे समिती स्थापन

करण्यात येत आहे. समितीच्या कामकाजासाठी, समिती विचारविनिमय करण्यासाठी इतरांना बैठकीसाठी आमंत्रित करु शकते.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ.श्रीमती कुमुद बन्सल, सेवानिवृत्त भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २ | श्री.मोहन आवटे, माजी शिक्षण संचालक | सदस्य |
| ३ | श्री.राजन फणसळकर, माजी शिक्षण संचालक | सदस्य |
| ४ | श्री.अनिरुध्द जाधव द्वारा - माजी प्राचार्य, राजर्षी शाहू महाराज,लातूर | सदस्य |
| ५ | श्री.बाबूरावजी झाडे,अध्यक्ष,संस्थाचालक संघटना, द्वारा नवप्रतिमा विद्यालय, मिरचीबाजार, सक्करदरा, नागपूर | सदस्य |
| ६ | श्री.रमेश पानसे, रास्तापेठ ,पुणे | सदस्य |
| ७ | श्री.आर.पी.जोशी, प्राचार्य, मुक्तांगण स्कूल, पुणे | सदस्य |
| ८ | सौ.विद्या येरवडेकर, पुणे | सदस्य |
| ९ | श्री.कृ.वा.तारे,समर्थ इन्स्टियूट ऑफ एज्युकेशन बिलनपुरा, सावरकर नगर, अचलपूर, जि.अमरावी | सदस्य |
| १० | श्री.ग्रेगरी लोबो, | सदस्य |
| ११ | श्री.प.म.राऊत, संस्था प्रतिनिधी, विद्या विकास शिक्षण संस्था, कन्नमवार नगर-२, विक्रोळी (पूर्व) | सदस्य |
| १२ | श्री.जैन , फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन | सदस्य |
| १३ | श्रीमती शबनम सिन्हा, शिक्षण तज्ञ, पूर्वी एन.सी.ई.आर.टी.च्या प्रतिनिधी | सदस्य |
| १४ | श्रीमती अरुंधती चव्हाण, पी.टी.आय.मुंबई | सदस्य |
| १५ | श्रीमती फरजाना दोहादवाला, आय.बी.शाळा | सदस्य |
| १६ | श्री.पवन पोदार, अध्यक्ष, पोदार एज्युकेशन ट्रस्ट (आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई. , आय.बी.) | सदस्य |
| १७ | श्री.के.बी.कुशल, विभागीय संचालक, डी.ए.व्ही. (सी.बी.एस.ई.) | सदस्य |
| १८ | श्रीमती आराधना श्रीकांत सोमाणी, विश्वस्त, जी.डी.सोमाणी ट्रस्ट, मुंबई | सदस्य |
| १९ | श्री.भालचंद्र देसले, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |

उपरोक्त स्थापन करण्यात आलेली समिती, शाळांनी शिक्षण शुल्क ठरविण्याकरिता कोणकोणत्या बाबींसाठी तरतूद करणे आवश्यक असते, त्याबाबत पुरक टिप्पणी तयार करणे, या बाबींचा सर्वकष समावेश करुन त्यांच्या शिफारशी सादर करेल. त्यानंतर त्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील व त्यावर लोकांकडून तक्रारी/सूचना मागविण्यात येतील.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २००१०६१११३१८४७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. मा. भट्टलवार )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

डॉ.श्रीमती कुमूद बन्सल, सेवानिवृत्त भा.प्र.से.
श्री.मोहन आवटे, माजी शिक्षण संचालक
श्री.राजन फणसळकर, माजी शिक्षण संचालक
श्री.अनिरुध्द जाधव द्वारा - माजी प्राचार्य, राजर्षी शाहू महाराज,लातूर
श्री.बाबूरावजी झाडे,अध्यक्ष,संस्थाचालक संघटना, द्वारा नवप्रतिभा विद्यालय, मिरचीबाजार, सक्करदरा, नागपूर
श्री.रमेश पानसे, रास्तापेठ ,पुणे
श्री.आर.पी.जोशी, प्राचार्य, मुक्तांगण स्कूल, पुणे
सौ .विद्या येरवडेकर, पुणे
श्री.कृ.पा.तारे,समर्थ इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन बिलनपुरा, सावरकर नगर , अचलपूर, जि.अमरावती
श्री.ग्रेगरी लोबो,
श्री.प.म.राऊत, संस्था प्रतिनिधी, विद्या विकास शिक्षण संस्था, कन्नमवार नगर-२, विक्रोळी (पूर्व)
श्री.जैन . फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन
श्रीमती शबनम सिन्हा, शिक्षण तज्ञ, पूर्वी एन.सी.ई.आर.टी.च्या प्रतिनिधी
श्रीमती अरुंधती चव्हाण, पी.टी.आय.मेंबर
श्रीमती फरजाना दोहादवाला, आय.बी.शाळा, रीजनल रीप्रेझेन्टिव्ह एमएसबी इन्स्टिटयूट ताहेरी मंझिल, तळमजला नेसबीट रोड, माझगांव, मुंबई ४०० ०१०.
श्री.पवन पोदार, अध्यक्ष, पोदार एज्युकेशन ट्रस्ट (आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई., आय.बी.)
श्री.के.बी.कुशल, विभागीय संचालक, डी.ए.व्ही. (सी.बी.एस.ई.)
श्रीमती आराधना श्रीकांत सोमाणी, विश्वस्त, जी.डी.सोमाणी ट्रस्ट, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक,माध्यमिक), जिल्हा परिषद
शिक्षण निरिक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा परिषद
अध्यक्ष/सचिव, आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई. , आय.बी.
मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, कार्यासन माशि-३.